संक्षिप्त फौ. ख. क्र.९२/२०२२
सरकार -वि.- लखन
नि.क्र. २ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नाव - सरस्वता गंगाधर वरखडे,
वय ५० वर्षे, व्यवसाय – शेत मजुरी,
राहणार – नऊखडा, ता. नागभिड, जि. चंद्रपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. घटनेची तारीख मला माहिती नाही. घटनेला दोन ते तीन वर्षे झाली आहेत. घटनेबाबत मला काहीही माहीत नाही. त्या दिवशी मी गाडीमध्ये बसून होते. त्यादिवशी गाडीमध्ये दहा ते बारा महिला होत्या. पोलिसांनी माझे बयान घेतले नाही. मी आरोपीला ओळखत नाही.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. आता मला माझ्या बयानातील अधोरेखीत भाग अ वाचून दाखविण्यात आला. तसे काही घडले नव्हते. तसे माझ्या बयानात का लिहून घेतले याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.
उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
दिनांक - २७.०३.२०२६
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.